RNI. No. MAHBIL/2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक २८] सोमवार, नोव्हेंबर २८, २०११/अग्रहायण ७, शके १९३३ [पृष्ठे ३, किंमत रुपये २०.००

असाधारण क्रमांक ६५

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २२.—मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. ... .. .. .. | १-३ |

## महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ नोव्हेंबर २०११.

## MAHARASHTRA ORDINANCE No. XXII OF 2011.

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE BOMBAY STAMP ACT, 1958

## सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २२.

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९५८ चा मुंबई ६०. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

१. (१) या अध्यादेशास, मुंबई मुद्रांक (सुधारणा) अध्यादेश, २०११, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम २ ची सुधारणा.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (के) मध्ये, उप-खंड (चार) नंतर, पुढील उप-खंड जादा दाखल करण्यात येईल :— १९५८ चा मुंबई ६०.

" (पाच) ई-प्रदानाची पावती ;".

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम १० ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम १० मधील, पोट-कलम (३) मध्ये,—

(क) खंड (३) मध्ये, " किंवा " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) खंड (४) मध्ये, " प्रदानादेशाद्वारे, " या मजकुराऐवजी, " प्रदानादेशाद्वारे ; किंवा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) खंड (४) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

" (५) ई-प्रदानाद्वारे ," ;

(घ) " मुख्य मुद्रांक कार्यालयात " या मजकुरानंतर, " किंवा, यथास्थिति, शासकीय पावती लेखांकन यंत्रणेत (आभासी कोषागार), " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ६९ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ६९ मधील, पोट-कलम (२) मध्ये, खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (कअ) ई-प्रदानाद्वारे मुद्रांक शुल्क भरण्याची रीत, आणि त्याचा परतावा ; ".

## निवेदन

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६०) याच्या कलम १० मध्ये, मुद्रांकाच्या स्वरुपात मुद्रांक शुल्क प्रदान करण्याची, आणि ज्या संलेखांवर कोणत्याही शासकीय कोषागारात किंवा उपकोषागारात किंवा मुख्य मुद्रांक कार्यालयात फ्रँकींग यंत्र, रोख रक्कम, दर्शनी धनाकर्ष, किंवा प्रदानादेश यांद्वारे मुद्रांक शुल्क प्रदान करण्यात येईल असे संलेख विनिर्दिष्ट करण्याचे अधिकार मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याला प्रदान करण्याची तरतूद आहे. मुद्रांक शुल्क प्रदान करण्याची आवश्यकता असलेले दस्तऐवज निष्पादन करण्याच्या प्रमाणात सतत वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे. विश्वसनीय अशा इलेक्ट्रॉनिक अभिलेखाद्वारे सर्वसामान्य जनतेला कार्यक्षम शासकीय सेवा देण्यास चालना देण्याच्या हेतुने, ई-प्रदानाद्वारे मुद्रांक शुल्क भरण्याच्या जलद, सुलभ आणि सुरक्षित अशा पद्धतीची तरतूद करता यावी म्हणून, उक्त अधिनियमात योग्य ती सुधारणा करणे इष्ट वाटते.

२. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८, यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २५ नोव्हेंबर २०११

**के. शंकरनारायणन्,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज. स. सहारिया,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS. 21-A. NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION. 21-A. NETAJI SUBHASH ROAD. CHARNI ROAD. MUMBAI 400 034. EDITOR · SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.